Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 12 | Aug – 2017

# पेशव्यांचा शूर सेनापती : बापू गोखले

श्री. कुंभार अनिल भिमराव
संशोधक विद्यार्थी , इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर..



## प्रस्तावना :

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या कालखंडात अनेक शूर सरदार होते. त्यामध्ये विठोजी होळकर, सातारचे चतुरसिंग भोसले, शिंदे, रास्ते, पटवर्धन, नागपुरकर भोसले, खंडेराव घोरपडे, आनंदराव घोरपडे, आनंदराव बाबर, दुर्गासिंग मोहिते इत्यादी सरदार होते, त्यामध्ये बापू गोखलेही होते. बापू गोखले स्वपराक्रमामुळे पेशव्यांचे विश्र्वसनीय सरदार, सेनापती, लष्करी अधिकारी बनले. बापू गोखले हे ताई तेलणीचे युद्ध, खडकीची लढाई, कोरेगावची लढाई, आष्टीची लढाई इत्यादी पराक्रमामुळे जास्त परिचित झाले.

## जन्म व पुर्वायुष्य :

बापू गोखल्यांचा जन्म इ.स. 1777 मध्ये पिरंदवणे, ता. विजयदुर्ग या ठिकाणी ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांचे मुळ नाव नरहर गणेश असे होते. बापू गोखल्यांच्या पत्नीचे नाव यमुनाबाई आणि मुलाचे नांव गोविंदराव बाबा हे होते. गोविंदराव बाबा हा ब्राम्हण वाड्यात मुक्कामी असताना ताप येवून मरण पावला.[1] बापू गोखल्यांचे चुलते धोंडोपंत याने बदामीच्या वेढ्यामध्ये विशेष पराक्रम दाखविल्यामुळे त्यास स्वतंत्र सरंजाम मिळाला. पुढे धोंडजी वाघाने चालविलेल्या पुंडाईचा मोड करण्यासाठी काढलेल्या स्वारीमध्ये तो मारला गेला. त्याचा सरंजाम बापू गोखल्यास मिळाला.[2]

## बापू गोखल्यांचे वर्णन :

बापू गोखले हे शरीराने धिप्पाड, सरळ नाक, डोळे सुरेख आणि पाणीदार होते. त्यांची शरीरकांती गौरवर्णाची होती. बापू गोखले हे शूर, ज्ञानी, मसलती, इमानी, लोकराजी, यशस्वी, आंतरनिष्ठ असे होते. सर ऑर्थर वेलस्लीच्या हाताखाली पेशव्याचे जे सैन्य देण्यात आले होते त्या सैन्यात बापू गोखले हे एक अधिकारी होते. इंग्रजांच्या सैन्यातील शिस्त कशी असते. लढाईच्या वेळी ते कशा प्रकारच्या युक्त्या करतात हे सर्व बापूंनी जवळून पाहिले होते. बापू गोखले स्वतः शूर आणि अनुभवी होते. आष्टीच्या लढाईत जनरल स्मिथ यांच्याशी लढाई देण्यासाठी जे कौशल्य आणि शौर्य त्यांनी दाखविले होते ते वाखाणण्यासारखेच होते.[3]

## बापू गोखल्यांचे साथीदार :

मराठ्यांच्या घसरत्या काळातसुद्धा शूर, पराक्रमी, स्त्री–पुरूष व सेनानायक सरदार होते. त्यामध्ये यशवंतराव होळकर, अमीरखान, रामचंद्र आप्पा पटवर्धन, आप्पासाहेब भोसले व त्यांचा एकनिष्ठ सेवक गणपतराव सुभेदार (परांजपे), सातारचे चतुरसिंग भोसले, आनंदराव बाबर, विसाजी देवराव पाच्छापूरकर देशपांडे, निपाणीकर आप्पा देसाई इत्यादी मुत्सद्दी राजकारणी आणि सेनानायक मंडळी बापू गोखल्यांच्या बरोबर होती.[4]

## सैन्याचा मुख्याधिकारी :

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात पटवर्धन, रास्ते व पानसे हे मुख्य जहागीरदार असून ते फौजबंद व पिढीजात काम केलेले होते. बाजीरावांकडून होणारा अन्याय त्यांना सहन होत नव्हता आणि जुलमी हुकूम अंमलात आणण्यास ते तयार नव्हते. कृष्णेच्या दक्षिणेकडील प्रदेशात त्यांचा चांगला प्रभाव असून वाघजी धोंड यांच्या

स्वारीपासून इंग्रजांबरोबर त्यांचे संबंध चांगले झाले होते. त्यांचा नक्ष उतरविण्यासाठी बाजीरावाने बापू गोखल्यास सरंजाम देवून सैन्याचा मुख्याधिकारी केठे आणि त्यांच्या खर्चासाठी प्रतिनिधींकडून घेतलेला मुलूख तोडून दिला.[5]

## मुख्य लष्करी सल्लागार व सेनापती :

बाजीराव आणि जॉन माल्कमची भेट व बाजीरावास त्याने माहुली येथे केलेल्या सुचना बाजीरावाच्या चांगल्याच पथ्यावर पडल्या. माहुली येथे राहून त्याने आपले पुढील बेत सावधगिरीने रचले. श्रावण महिन्यात याठिकाणी मोठी यात्रा भरते. व जंगी कुस्त्या होतात. यावेळी बाजीरावाने पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी फौजा जमविण्याचा प्रयत्न केला. कुस्त्यांसाठी आलेल्या माणसांमधून त्याने आपल्या सैन्याची निवड केली. त्यासाठी त्याने बापू गोखले यांना मुख्य लष्करी सल्लागार व सेनापती केले. गोखल्यांना बाजीरावाचा चंचल स्वभाव माहित असल्यामुळे तुमच्या शिवाय दुसऱ्या कोणाचाही सल्ला मी ऐकणार नाही, तुमच्या सांगण्याप्रमाणे मी सर्वथा वागेन.'' असा बाजीरावाचा स्वदस्तुरचा लेख बापूने लिहून घेतला. आणि इमान पाळण्याच्या शपथा घेवविल्या. यापुढे कोणी गृहस्थ बाजीरावाकडे सुचना करण्यासाठी आला तर तुम्हास काही कळविणे असेल ते गोखल्यांस कळवा असे तो इतरांना सांगू लागला.[6]

## मंगळवेढ्यातील बापू गोखल्यांचा वाडा :

आपल्या तलवारीच्या जोरावर मराठी साम्राज्य टिकविण्याची धडपड करणारा हा शूर योद्धा मंगळवेढा याठिकाणी राहत होता. मंगळवेढ्यामध्ये मारवाडी गल्लीत बापू गोखल्यांचा वाडा आजही पडक्या स्वरूपात आहे.[7]

## पेशव्यांशी शाब्दिक चकमक :

पेशवे आष्टीच्या तळावर मुक्कामास आले, त्या रात्रीच बापूंना इंग्रज फौजा जवळ आल्याचे समजले होते. त्यामुळे त्यांनी पेशव्यांना रात्रीच्या जेवणानंतर पुढे जाण्याची विनंती केली. परंतु पौर्णिमेचे स्नान आणि भोजन करून जाण्याचा त्यांचा मनोदय होता. यामुळे बापू गोखले चिंताग्रस्त झाले. कारण इंग्रज फौजा जवळ आल्या होत्या. दुसऱ्या दिवशी (20 फेब्रु. 1818) इंग्रज जवळ आले आहेत आता आपण पळू नये.'' असे गोखले म्हणतात.

आजपर्यंत तुम्ही लढाईची मसलत दिली आणि आता आम्हाला जेवावयासाही हरकत येते? असेच आमचे संरक्षण करणार की काय. असे बापू गोखल्यास पेशवे बोलले. याचा गोखल्यांना राग येवून आपला हुकूम असो वा नसो, आज मी लढाई देणार असे बोलून इंग्रजांचा सामना करण्यास निघून गेले. जाण्यापूर्वी 'आपले चरणदर्शन याउपरी होईल तर उत्तम न होय तरी हेच शेवटचे चरणदर्शन समजावे.' असे बोलून पेशव्यांना नमस्कार केला.[8]

## प्रतिनिधींशी युद्ध :

बळवंतरावाने बाजीरावास मदत मागताच त्याने बापू गोखल्यास प्रतिनिधीवर पाठवले. गोखल्यांच्या मदतीने काशीबाईने गणेशपंत प्रतिनिधीस मसूरच्या गढीमध्ये कैद केले. परंतु पंताची रखेल ताई तेलीण हिने फौज जमवून वासोटा किल्ला हस्तगत करून बंड केले आणि मसूरवर चालून येवून प्रतिनिधींची सुटका केली. त्यानंतर पंताने मुलखात धुमाकूळ चालविला. आम्ही छत्रपतींचे नोकर आहोत, बाजीरावाची आज्ञा आम्ही मानणार नाही. तेव्हा बाजीरावाने पुन्हा बापू गोखल्यास त्याच्यावर पाठविले. पंताने गोखल्यांचा सामना समोर न करता डोंगरी भागात बचावाचे धोरण स्विकारले असते तर त्याचा गोखल्यापुढे थोडाफार निभाव लागला असता. परंतु वसंत गडाखालील मैदानात त्याने गोखल्यांवर चाल केली. कोणेगावचे रानात 27 मार्च 1806 रोजी दोघांमध्ये लढाई झाली. यामध्ये प्रतिनिधीला 14 जखमा झाल्या. त्याचा डावा हात तुटला. तेव्हापासून त्यांना 'थोटेपंत' असे म्हणू लागले. प्रतिनिधींची सर्व संपत्ती गोखल्याने लुटून घेतली. त्यांचा एकंदर सरंजामही बाजीरावाने गोखल्यांच्या ताब्यात दिला. कित्येक वर्षे हा सरंजाम गोखल्यांच्या ताब्यात होता.[9]

## खडकीची लढाई (5 नोव्हेंबर 1817) :

पेशवे दरबारात पेशवा आणि गोखले यांच्यात सल्ला–मसलत चालू असताना यावेळी लढाई द्यावी असा सल्ला गोखल्याने दिला. त्यानुसार खडकीच्या मैदानात 5 नोव्हेंबर 1817 ला इंग्रज–मराठा यांच्यात लढाई सुरू झाली. मुठा नदीच्या पश्र्चिमेस भांबुर्ड्यापासून चतुःश्रृंगी संगम, गणेश खिंडीचा डोंगर या भागात मराठी सैन्य पसरले होते. मराठी सैन्याने चांगला पराक्रम करून इंग्रजांचे खूप नुकसान केले. परंतु एलफिन्स्टनने दुसऱ्या

दिवशी बाजीरावाकडे बोलणी सुरू केल्यामुळे बापू गोखल्यास बाजीरावाने लढाई थांबविण्यास सांगितले.[10] या लढाईत पेशव्यांच्या सैन्याने इंग्रज फौजांवर निर्णायक विजय मिळविण्याची वेळ आली असता लढाई थांबविण्याचा बाजीरावाचा हा निर्णय आत्मघातकी होता. 5 नोव्हेंबर पासून पुढे 11 दिवस पेशव्याने इंग्रजांवर शस्त्र उचलले नाही. याचा फायदा घेवून इंग्रजांनी 11 दिवसाच्या विश्रांतीनंतर मराठ्यांचा पराभव केला.

'मी तुमचेशिवाय कोणाचाही सल्ला ऐकणार नाही', असे बाजीरावाने पत्र देवूनही खडकीच्या लढाईवेळी त्याने गोखल्यांचा सल्ला मानला नाही.[11]

### येरवड्याची लढाई (16 नोव्हेंबर 1817) :

येरवड्याच्या लढाईच्यावेळी बाजीराव पेशव्यांचा तळ घोरपडीवर होता. इंग्रजांची फौज घोरपडीवर चालून येत असल्याचे समजताच बाजीरावाचा धीर सुटला आणि 16 नोव्हेंबर 1817 रोजी पहाटे चिमाजी आप्पांना घेवून सासवडला पळून गेला. चिमाजी आप्पांनी त्यांना थांबण्याची विनंती केली. परंतु बाजीरावाने त्यांचे ऐकले नाही. शेवटी 16 नोव्हेंबर 1817 रोजी लढाईस सुरूवात झाली. रात्रीच श्रीमंत लष्करातून पळून गेल्यामुळे सैन्याचा धीर सुटला. गोखले, रास्ते, पटवर्धन, पुरंदरे, नारोपंत आपटे इत्यादी सरदार मंडळी निकराने इंग्रजांशी लढत असताना श्रीमंतानी असा प्रकार केल्यामुळे मराठ्यांचा या लढाईत पराभव झाला.[12] खडकी आणि येरवडा येथील लढाया बाजीरावाच्या नाकर्तेपणामुळे आणि भित्रेपणामुळे निरूपयोगी ठरल्या. बाजीराव पुण्यातून निघुन गेल्याने पुणे शहर इंग्रजांना मोकळे सापडले.[13]

### कोरेगावची लढाई (1 जानेवारी 1818) :

जनरल स्मिथची फौज शिरूरहून येत असता तिच्यावर एकट्या नारोपंत आपट्यांना न पाठविता मोठी फौज पाठविली असती म्हणजे या लढाया पुण्याच्या बाहेर होवून राजधानीचा बचाव झाला असता. फौजेतील सैन्यांना धीर येण्यासाठी स्वतः पेशव्याने फौजेत हजर राहणे गरजेचे होते. तसे बाजीरावाने खडकी आणि येरवड्याच्या लढाईत न केल्यामुळे फौजेचा धीर सुटला. घोड नदीहून इंग्रज फौजा पुण्यास येत असताना त्यांची बाजीरावाशी आकस्मित गाठ पडली. त्यावेळी बाजीरावाने बापू गोखल्यांस सांगितले की आज लढाई करून आम्हास पुढे जाण्यास मार्ग करून द्यावा. 1 जानेवारी 1818 रोजी लढाईत सुरूवात झाली. या लढाईत इंग्रजांचे 175 लोक जखमी झाले. आणि मराठ्याचे 500 लोक कामी आले. या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. थोड्या सैन्याने पुष्कळांशी लढा देऊन आपला निभाव केल्याबद्दल कोरेगाव याठिकाणी इंग्रजांनी एक स्मारक स्तंभ उभारला.[14]

### आष्टीची लढाई (20 फेब्रुवारी 1818) :

कोरेगावच्या लढाईनंतर पेशव्यांच्या फौजेपैकी 10 हजार सैन्य घेऊन नारो विष्णु आपटे वाघोलीपर्यंत आला. या फौजा पुण्यावर येणार या भीतीने इंग्रज पुणे सोडण्याच्या तयारीत होते. परंतु पेशव्याने आपला मोर्चा सातार्‍याकडे वळविला. पाठीमागून त्यांच्या फौजा कोरेगावाहून राजेवाडीपर्यंत गेल्या. येथून दोन तुकड्या करून एक तोफखाना व पायदळ घेऊन बागलकोटवरून निपाणीच्या मैदानात लढाई घ्यावी अशा रोखाने पुढे आली. आणि दुसरी एलफिन्स्टन छापा घालण्यास येणार यामुळे त्यांची आघाडी पिछाडी मारण्यास कवठे पर्यंत गेली. स्मिथ व एलफिन्स्टन आपल्यावर चालून येत आहेत असे बाजीरावास समजताच त्याने आपला मोर्चा फलठटणकडे वळविला.[15] नांदगिरी याठिकाणी बापू गोखल्याने स्मिथला अडवल्यामुळे पेशव्यांस पळून जाण्यास संधी मिळाली. बाजीराव स्वतःहन पळतो आहे हे पाहून एलफिन्स्टन सातार्‍यास गेला आणि स्मिथला बाजीरावाच्या मागावर पाठविले. बाजीराव फलटणवरून सोलापूरला गेला. त्याठिकाणी असणारा नागपूरकर आप्पासाहेब भोसल्यांचा सरदार गणपतराव सुभेदार पेशव्यांना येवून मिळाला. सोलापूरचा बंदोबस्त विसाजी देवराव पाच्छापुरकर देशपांडे यांना सांगून पेशवा परांड्याच्या दिशेने निघून आष्टी (ता. मोहोळ) याठिकाणी (19 फेब्रुवारी 1818) मुक्कामास आला.[16]

बाजीराव पेशवे आष्टीच्या तळावर मुक्कामास आले, त्या रात्रीच बापू गोखल्यांस त्यांच्या हेरांमार्फत इंग्रज जवळ आल्याचे समजले होते. त्यावर बापूंनी श्रीमंताना पुढे जाण्याची विनंती केली होती, परंतु पौणिमेचे स्नान आणि भोजन करून जाण्याचा बाजीरावाचा निश्र्चय असल्याने गोखले हतबल झाले. दुसर्या दिवशी बापू गोखल्यांनी श्रीमंतास सांगितले की 'इंग्रज जवळ आले आहेत आता आपण पळू नये.' त्यावर श्रीमंत म्हणाले

की,'आजपर्यंत तुम्ही लढाईची मसलत दिलीत आणि आता आम्हांस जेवण्यासही हरकत येते, असेच आमचे संरक्षण करणार की काय?' या त्यांच्या बोलण्याचा गोखल्यांना राग आला. ते म्हणाले की,' आपला हुकूम असो वा नसो मी आज लढाई देणार' असे बोलून ते इंग्रजांचा सामना करण्यास निघून गेले. त्यांच्याबरोबर मुधोळकर, गोविंदराव घोरपडे, बर्हिजी सितोळे हे ही इंग्रजांवर चालून गेले.[17]

पेशव्यांच्या छावणीवर छापा घालण्यासाठी सतत त्यांच्या मागावर असलेला जनरल स्मिथ वेळापूर येथून सकाळीच आष्टीच्या तळाजवळ आला होता. त्याच्याजवळ ड्रॅगन पलटणीच्या दोन तुकड्या, मद्रासची 7 वी नेटीव्ह घोडेस्वारांची पलटण आणि 2 री घोडेस्वारांची नेटीव्ह पलटण होती.18 बापू गोखल्यांच्या घोडेस्वारांच्या पठटणीतील काही घोडेस्वारांच्या तुकडीने 22 व्या नेटीव्ह घोडेस्वारांच्या तुकडीस वळसा घालून बाजूस असणाऱ्या 7 व्या घोडेस्वारांच्या नेटीव्ह पलटणीवर चाल करून गेले. 22 व्या घोडेस्वारांच्या ड्रॅगन तुकडीवर पिछाडीवरून हल्ला करण्यासाठीही त्यांनी चाल केली. अशा रितीने बापू गोखल्यांच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्यांना चारही बाजूने घेरले. युद्ध कौशल्याच्या दृष्टीने बापू गोखलेंची सरशी झाली होती.

सेनापती बापू गोखले यांनी इंग्रजांचा छापा रोखून धरण्यासाठी 500 घोडेस्वारांची तुकडी मुधोळकर घोरपडे, गोविंदराव घोरपडे, आनंदराव बाबर आणि पाच्छापूरकर देशपांडे यांना बराबर घेवून इंग्रज फौजांना कोंडीत धरले. इंग्रज अधिकारी डॉवेस याने उजव्या बाजूने सैन्य मागे घेवून डाव्या बाजूच्या ड्रॅगन सैन्याकडून गोखल्यांच्या तुकडीवर हल्ला केला. या तुकडीचा हल्ला परतवून लावण्यासाठी बापू गोखले पुढे गेले, त्यावेळी समोर असणाऱ्या लेप्टनंट वॉरंड या इंग्रज अधिकाऱ्यावर वार केला.[19] यावेळी बापू गोखल्यांना पिस्तुलाच्या तीन गोळ्या लागल्या आणि तलवारीच्या दोन जखमा झाल्यामुळे सेनापती बापू गोखले घोड्यावरून खाली पडले आणि त्यातच त्यांचा अंत झाला.

आपल्या तलवारीच्या सामर्थ्यांवर मराठा साम्राज्य टिकविण्यासाठी धडपड करणारा पेशव्यांचा अर्थात मराठ्यांचा शूर सेनापती बापू गोखले यांचा आष्टीच्या लढाईत 20 फेब्रुवारी 1818 रोजी मृत्यु झाला. या लढाईत मराठ्यांचा पराभव होवून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात इंग्रजाचे राज्य सुरू झाले.[20]

## बापू गोखले यांची समाधी :

आपल्या तलवारीच्या बळावर मराठ्यांचे साम्राज्य टिकविण्यासाठी धडपडणाऱ्या योद्धाचा माघ' शुद्ध पौर्णिमा 20 फेब्रुवारी 1818 च्या इंग्रज मराठा युद्धात पेशव्यांचा शूर सेनापती बापू गोखले यांचा मृत्यु झाला. लढाईच्या दिवशी मृत्युमुखी पडलेल्या बापू गोखल्यांच्या अंगात फक्त मलमली अंगरखा राहिला होता. घोड्यांनी तुडविल्यामुळे पायाचे कातडे गेले होते. अशा स्थितीत बापूंचा मृतदेह सातारचे छत्रपतींनी ओळखून आष्टीच्या ओढ्याकाठी त्यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. अशा या शूर सेनापती बापू गोखल्यांची समाधी आष्टी या गावी आहे.

## सारांश :

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीमध्ये बापू गोखले हे विश्र्वसनीय सरदारांपैकी एक होते. धोंडजी वाघाच्या स्वारीमध्ये बापू गोखले आपले चुलते धोंडोपंत यांच्याबरोबर होते. धोंडोपंत यांच्या मृत्युनंतर स्वपराक्रमाने सैन्याचा मुख्याधिकारी, मुख्य लष्कारी सल्लागार, सेनापती झाले. माहुली मुक्कामी असताना पेशव्यांनी बापूंना दिलेल्या एका पत्रातून स्पष्ट होते की, दुसऱ्या बाजीरावाचा बापू गोखले हा अत्यंत विश्वासू सरदार होता. तुमच्या शिवाय दुसऱ्या कोणाचाही सल्ला मी ऐकणार नाही, तुमच्या सांगण्याप्रमाणे मी सर्वथा वागेन. बापू गोखल्याने बाजीरावाचे संरक्षण योग्यप्रकारे केल्याचे येरवड्याची लढाई, कोरेगावची लढाई आणि आष्टीची लढाई यावरून दिसून येते. अखेर मराठ्यांचे साम्राज्य टिकविण्यासाठी धडपड करणारा शूर सेनापती आपले कर्तव्य बजावत असताना 20 फेब्रुवारी 1818 रोजी आष्टीच्या लढाईत कामी आला. त्यांच्याबरोबर आनंदराव बाबर, गोविंदराव घोरपडे हेही आपले कर्तव्य बजावत असताना कामी आले.

## संदर्भ साधने :

1) खरे, ग.ह इतिहासकर्ते मराठे भारतीय इतिहास संशोधक मंडळ, पुणे 1951.

2) देशमुख गोपाळ मारूती, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, रेवू प्रकाशन पंढरपूर, प्रथमावृत्ती फेब्रुवारी 2009. पान नं. 355

3) कित्ता, पाननं. 364.

4) कित्ता, पाननं. 363.
5) सरदेसाई, गो.स., मराठा रियासत खंड 8, पान नं. 393.
6) कित्ता, पाननं. 504.
7) आवताडे नानासाहेब व्यंकटेश, श्री संत दामाजी चरित्र, श्री संत दामाजी संस्था, मंगळवेढा, पुर्नमुद्रित 2006, पान नं. 14
8) उपरोक्त, देशमुख गोपाळ मारूती, पान नं. 359
9) उपरोक्त, सरदेसाई, गो.स., पान नं. 385.
10) उपरोक्त, देशमुख गोपाळ मारूती, पान नं. 353.
11) कित्ता, 354.
12) उपरोक्त, सरदेसाई गो.स., पान नं. 514.
13) उपरोक्त, देशमुख गोपाळ मारूती, पान नं. 354.
14) उपरोक्त, सरदेसाई, गो.स., पान नं. 520.
15) कित्ता, पाननं. 520.
16) उपरोक्त, देशमुख गोपाळ मारूती, पान नं. 357.
17) उपरोक्त, सरदेसाई गो.स., पान नं. 521.
18) उपरोक्त, देशमुख गोपाळ मारूती, पान नं. 359.
19) कित्ता, पाननं. 363.
20) कित्ता, पान नं. 364.
21) कित्ता, पान नं. 367.